| बीड - महाराष्ट्र | सोमवार दि. 10 ते 16 मार्च 2025 | वर्ष 1 ले | अंक 45 | पाने 4 | टीसी-एमए एच आर - 52678 | किंमत 2 रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| Beed - MAHARASHTRA | Monday 10 to 16 January 2025 | Year 1 | ISSU 45 | Page 4 | TC-MAHMAR - 52678 | Pirce 2 रुपये |

साप्ताहिक दिव्य

# वास्तव

संपादक - सचिन पवार


# बीडचा नवा 'आका', खोक्याच्या घरावर पोलिसांचा छापा ; काय-काय सापडलं?

## खोक्याचे नवनवे कारनामे समोर येऊ लागल्यानंतर सुरेश धस यांचीही राजकीय कोंडी

» बीड | प्रतिनिधी

गुन्हेगारी घटनांमुळे मागील काही महिन्यांपासून चर्चेत असलेल्या बीड जिल्ह्यात आणखी एका गुन्हेगाराचे धक्कादायक कृत्य समोर आले आहे. जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील सतीश भोसले उर्फ खोक्या याचे नवनवे प्रताप समोर येत आहेत. खोक्याकडून एका व्यक्तीला अर्धनग्न करून मारहाण केली जात असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तो वन्यप्राण्यांची शिकार करत असल्याचीही माहिती समोर आली. या पार्श्वभूमीवर आज वनविभागाने पोलिसांसह खोक्याच्या घरावर धाड टाकली. या धाडीत शिकारीच्या साहित्यासह धारदार शस्त्रेही आढळून आल्याचे समजते. पोलिसांनी आज सतीश भोसले याच्या घरी टाकलेल्या धाडीत मोर आणि हरीण पकडण्यासाठी लागणारी जाळी, वाघोर, धारदार शस्त्र आणि वन्य प्राण्यांचे मांसही जप्त केल्याची माहिती आहे. सतीश भोसले याने यापूर्वी अनेकदा प्राण्यांची शिकार केल्याचं बोललं जात आहे. परंतु त्याचे आता विविध व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर वनविभागालाही जाग आली असून त्याच्याभोवती कारवाईचा फास आवळण्यास सुरुवात झाली आहे.

### खोक्यामुळे सुरेश धसही अडचणीत

■ **बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून भाजपचे आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी मोठ्या प्रमाणात रान उठवलं होतं. देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींच्या पाठीशी राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांची राजकीय शक्ती उभी असल्याचा आरोप आमदार धस यांनी केला होता. परंतु बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात दहशत निर्माण करणारा सतीश भोसले उर्फ खोक्या हा सुरेश धसांचा कार्यकर्ता असल्याचं उघड झालं आहे. खोक्याचा एकएक कारनामा समोर येऊ लागल्यानंतर सुरेश धस यांचीही राजकीय कोंडी झाल्याचं दिसत आहे.**

### सतीश भोसले कुख्यात गुन्हेगार

■ **सतीश भोसले हा कुख्यात गुन्हेगार आहे. त्याच्याविरोधात बीड व अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण ६ प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. यामध्ये विवाहितेचा छळ करणे, अपहरण करणे, जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, जीवे मारण्याच्या धमक्या देणे आदींचा समावेश आहे.**

# पाटोद्याचा पोलीस कर्मचारी रक्षकच झाला भक्षक!

## महिलादिनी पाटोदा पोलीस ठाण्याच्या बीट अमलदाराने केला महिलेवर बलात्कार

» पाटोदा | प्रतिनिधी

पाटोदा पोलीस ठाण्याचे बीट अमलदार उद्धव गडकर यांने महिला दिनानिमित्त कार्यक्रमासाठी एका महिलेला बोलावून पाटोदा येथील स्टेट बँकेच्या बाजूला असलेल्या घरात घेऊन त्या महिलेवर बलात्कार केल्याची घटना पाटोद्यात घडल्याने रक्षकच भक्षक झाल्याचे चर्चा सध्या पाटोद्यात सुरू आहे. घडलेल्या घटने संदर्भात पाटोद्यात संतप्त प्रतिक्रीया उमटत आहे.



यासंदर्भात पाटोदा पोलिसांकडून प्राप्त माहिती अशी की गेवराई तालुक्यातील महिला मागील काही प्रकरणात पाटोदा पोलीस ठाण्यात ये-जा करीत असल्याने पाटोदा पोलीस ठाण्यातील बीट अमलदार उद्धव गडकर या कर्मचाऱ्याच्या संपर्कात आली होती. यानिमित्ताने मोबाईल क्रमांकांची देवाणघेवाण झाली यातून त्यांच्यात संभाषण व मॅसेज आदी होत होते यांच संधीचा लाभ घेत त्या कर्मचाऱ्याने महिला दिनाचे निमित्त सांगुन त्या महिलेला पाटोदा येथे बोलावून घेतले होते ती महिला पाटोद्यात आली असता स्टेट बँक च्या बाजूला घेऊन जात महिलेवर बलात्कार केला.यावेळी त्या महिलेने आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला मात्र तिला चोरीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत बलात्कार केला.

दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ती महिला तक्रार दाखल करण्यासाठी पाटोदा पोलीस ठाण्यात येवून स्वतः पोलीस निरीक्षक यांच्या समोर सांगितले आहे.दुपारी १ वाजल्यापासून ती महिला पोलीस ठाण्यातच बसून होती घटनेची गांभीर्य पाहून पोलीस उपअधीक्षक बाळकृष्ण हुनगुडे पाटील यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात भेट देत व तपासा संदर्भात सुचना केल्या संध्याकाळी ६-३० सुमारास त्या महिलेला वैद्यकीय तपासणीसाठी बीड येथे पाठविण्यात आले आहे. त्या पोलीस कर्मचाऱ्या विरोधात गुन्हा क्र 77/25 भा.द.वी 64/2 -A(1) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पाटोदा पोलीस करत आहे.

# शिवजयंती चषक मोठ्या उत्साहात सौताडा येथे संपन्न

## शिवजयंती चषक चे मानकरी ठरले मुगगाव वारियर्स' तर द्वितीय संघ ठरला 'शिवप्रेमी क्रिकेट क्लब' सौताडा

» कुसळंब | प्रतिनिधी

युगपुरूष विश्ववंदनिय छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमीत्त सौताडा येथे 'शिवजयंती चषक 2025' भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं.या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक 25 हजार रूपये (मा.सभापती मा. महेंद्र गर्जे) द्वितीय पारितोषिक 21 हजार रूपये (सरपंच सौताडा महादेव घुले) तृतिय पारितोषिक 11 हजार रूपये (मा.सरपंच शिवाजी पवार मेजर कुसळंब) ठेवण्यात आले होते. सलग 5 दिवस सामने चालले. अनेक गावच्या क्रिकेट संघांनी सहभाग नोंदवला. यामध्ये प्रथम विजेता संघ



ठरला ऊत्कुष्ट क्रिकेटपटु राहुल खोटे यांचा 'मुगगाव वॉरियर्स' तर द्वितीय विजेता संघ ठरला 'शिवप्रेमी क्रिकेट क्लब' सौताडा तर तृतिय विजेता संघ ठरला 'बिल्डर-11 जामखेड' , सर्वच संघांनी ऊत्कृष्ट खेळ दाखवला.या संपूर्ण स्पर्धेचं आयोजन सौताडा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा बीड रा.यु.काँ. चे जिल्हा ऊपाध्यक्ष श्री.दत्ता शिंदे यांनी व त्यांच्या सहका-यांनी पाहिलं. यामध्ये अक्षय पेचे,योगिराज शिंदे,हनुमंत खंडागळे,सुखदेव ऊबाळे,सलमान पठाण,रामदूत सानप,अभि दरे,राहुल पेचे आदिंनी परिश्रम घेतले.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या तालुकाध्यक्षपदी गोकुळ इंगोले

» पाटोदा | प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी पाटोदा तालुकाध्यक्षपदी गोकुळ इंगोले, कार्याध्यक्ष हरिदास शेलार तर सचिवपदी नितीन भोंडवे यांची निवड जाहीर केली आहे.

प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाल्याने, या पुढील काळात प्रत्येक घटना आणि माहिती तात्काळ वाचक आणि प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि त्यासोबतच



डिजिटल मीडियामध्ये काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकारांच्या हितासाठी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी डिजिटल मीडिया परिषद स्थापन केली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी दिनांक 3 मार्च 2025 रोजी डिजिटल मीडियाची बीड तालुका कार्यकारणी पुढील दोन वर्षासाठी जाहीर केली आहे. यात तालुकाध्यक्षपदी- गोकुळ इंगोले, कार्याध्यक्ष- हरिदास शेलार, उपाध्यक्ष- प्रदीप उबाळे, सचिव- नितीन भोंडवे तर संघटकपदी- बलभीम सावंत यांचा समावेश आहे.

बीड तालुक्यात यूट्यूब चैनल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून शेकडो पत्रकार काम करत आहेत. त्यांना संघटित करून योग्य दिशेने आणि सुसूत्र पद्धतीने डिजिटल मीडियाचे काम व्हावे. त्यासोबतच या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला सुरक्षा देऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे.

यासाठी पाटोदा तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी करून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मस्साजोग ते बीड सदभावना पदयात्रेत सामील व्हा : राहुल जाधव

» पाटोदा | प्रतिनिधी

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील मसाजोग ते बीड सदभावना पदयात्राचे काँग्रेसच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.जिल्ह्यातील काँग्रेस ॲक्शन मोडवर आली असून, खासदार सौ. रजनी पाटील यांनी विशेष लक्ष केंद्रित केल्याची चर्चा असून सदरील सदभावना पदयात्रा यशस्वी करण्याच्या अनुषंगाने खासदार रजनी पाटील



यांच्या सुचनेवरून व बीड जिल्हा काँग्रेस चे अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी सक्रिय झालेले आहेत.बीड जिल्हा हा सामाजिक समता, सहिष्णूता व पुरोगामी विचार तसेच समतावादी विचाराचा वारसा व सामाजिक समतोल अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील राजकारण विरहित समतावादी, पुरोगामी विचार जपणारे व संविधानाचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येकाने सदभावना पदयात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन पाटोदा तालुका राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी केले आहे.

# प्रशासनाने आता सर्वसामान्य जनतेला त्रास देणाऱ्यांना न सांगता धडा शिकवा!

## आका- खोक्यांना प्रशासनाचा वचक बसू लागल्याने सर्वसामान्य जनता घेऊ लागली मोकळा श्वास!

» बीड | सचिन पवार

बीड जिल्हा म्हटलं की सध्या गुन्हेगारी क्षेत्रात माहेरघर असल्याचं बोललं जात आहे सोशल मीडियावर बीड जिल्ह्याला खूपच बदनाम केल्याच्या चर्चाही आहेत पण बदनाम नव्हे त्या बदनामीला काळिंबा फाचेल असं कृत्य बीड जिल्ह्यात सुरू आहे आणि ते जग जाहीर आहे. प्रत्येक राजकीय नेत्यांनी आपल्याकडे अशा गुन्हेगारी क्षेत्रातील टोळ्या पोचल्याच्या चर्चा सुद्धा आहेत. आता सर्वसामान्य त्यांच्या दहशतीला भीत असल्याने समोर येत नाही त्यामुळे प्रशासनाने आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनी आपण शासनाचा पगार घेतो या हेतून सर्वसामान्यांना त्रास होणार नाही असे काम स्वतःहून हाती घेऊन सर्वसामान्य जनतेला या त्रासातून मुक्त करावं एवढीच अपेक्षा जनतेने व्यक्त केली आहे. गुन्हेगारांची नावे आम्हाला सांगण्याची गरज का यावी प्रशासन कशाचा पगार घेत आहे हा प्रश्न देखील जनतेतून पुढे येत आहे. तुम्ही पगार त्यासाठी घेता ते काम जर व्यवस्थित केलं तर सर्वसामान्य जनता सुखान आनंदान जगेल अशा देखील भावना सर्वसामान्य जनतेतून पुढे येत आहेत. आका खोक्या अशा गुन्हेगारी वृत्तीच्या टोळीला आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांना प्रशासनानच न सांगता धडा शिकवावा तरच जनता समाधानी होईल अन्यथा पहिले पाढे तेच असं म्हणण्याची वेळ येईल यात शंका नाही. आकाबाका खोका अशा नावाने आपल्या डोळ्या तयार करणे आणि राजकीय नेत्यांना पाठबळ देणं हे किती पर्यंत योग्य आहे याचं चिंतन प्रशासनाने करणे गरजेचे आहे. प्रशासनातील अधिकारी अशांना पाठबळ देतात आणि हे अशा टोळ्या बनवून राजकीय नेत्यांना पाठबळ देतात आणि याचा फटका सर्वसामान्य ला बसतो आणि त्यांच्या अधिकाराला ही बसतो. येणाऱ्या काळात आकाची टोळी खोक्याची टोळी अशा वेगवेगळ्या नावाने असलेल्या टोळ्या जेरबंद करून त्यांना वेळीच धडा शिकवला पाहिजे अशा भावना सर्वसामान्य जनतेमधून व्यक्त होत आहेत त्यामुळे प्रशासनाचा खडबडून जागे होईल का का पुन्हा झोपेत सोंग घेऊन पहिले पाढे तेच म्हणण्याची वेळ येईल हे पहावं लागेल.



### आका खोक्यांच्या टोळ्यांचा जेरबंद प्रशासन कायमचा करणार का ?

■ **आका-खोक्या हे नाव आता तरी चर्चेला आले असले तरी याची पाळमूळ खोलवर गेलेले आहेत त्यामुळे त्या खोलात प्रशासन जाऊन त्यांचा कायमचा बंदोबस्त करेल का असा प्रश्न देखील सर्वसामान्य जनतेला पडला आहे जर पाळमूळ उपटून काढली तर सर्वसामान्य जनता आनंदाने जगेल अशा भावना ही व्यक्त होत आहेत..**




### पोलीस प्रशासनातील सर्व कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना पगार मिळत असेल तर...

■ **महाराष्ट्रातील प्रत्येक पोलीस अधिकारी कर्मचारी यांना पगार शासनाचा मिळतो मग काम हे गुन्हेगारी वृत्ती असलेल्या डोळ्यांचे आणि नेत्यांचं का करतात बरं ? पगार शासनाकडून घेतला तर शासनाचं काम त्यांनी केलं पाहिजे जनतेला आधार दिला पाहिजे त्रास होणाऱ्या ठिकाणी खंबीरपणे उभे राहिल पाहिजे हे प्रशासनाचे काम आहे ते सांगण्याची गरज नाही सांगितलं तरच काम करणारे अधिकारी बीड जिल्ह्यात असल्याने गुन्हेगारी वृत्ती वाढली आहे. बीड जिल्ह्यामध्ये आसाम हरियाणा पंजाब जम्मू काश्मीर इकडचे कर्मचारी नेमणूक केले पाहिजेत त्यांना मुक्त अधिकार दिले पाहिजेत तरच गुन्हेगारी वृत्तीला आळा बसेल अन्यथा पहिले पाढे तेच अशी म्हणण्याची वेळ येईल यात शंका नाही...**

### नेत्यांना अशा टोळ्यांची गरज का पडते ?

सध्या बीड जिल्ह्यामध्ये गुन्हेगारी वृत्तीच्या टोळ्या नेत्यांसाठी काम करताना पाहायला मिळत आहेत त्यांचे कनेक्शनही समोर येत आहेत पहिली गोष्ट नेत्यांना अशा गुन्हेगारी वृत्ती करणाऱ्या लोकांची गरज का पडते हाच मोठा प्रश्न आहे. आणि त्यांना जर अशा गुन्हेगारांनी वृत्ती करणाऱ्या लोकांची गरज पडत असेल तर त्यांनी राजकारण सोडावं पश्चिम महाराष्ट्राचा थोडाफार आदर्श घ्यावा अशाच भावना बीड जिल्ह्यातील जनता व्यक्त करत आहे..

# काम दमदार पण प्रसिद्धीपासून लांब...

## विविध क्षेत्रातील महिलांची फिनिक्स गगनभरारी; जागतिक महिला दिनानिमित्त सोमवारी आष्टी तालुका युवा पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन करणार सन्मान...

### महिलादिन विशेष...

» आष्टी प्रतिनिधी

समाजात काम करत असताना आपलं काम अन् आपण असा मनात निश्चय करून गेल्या अनेक वर्षापासून कुठलीही अपेक्षा न करता आपल्या क्षेत्रात दमदारपणे काम करून फिनिक्स पक्षाप्रमाणे आकाशात गगनभरारी घेऊन आपल्या कर्तत्वचा ठसा उमटविला. एक महिला असून ही आपले एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या आष्टी तालुक्यातील जिगरबाज व कर्तृत्ववान महिलांचा सोमवार दि १० मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी पंचायत समिती येथील सभागृहात सकाळी ११ वाजता आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार देऊन गौरव व सन्मान करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याला मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले आहे.

शहरात व ग्रामीण भागात विविध क्षेत्रात काम करून महिला नेहमीच पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून 'हम भी किसीसे कम नहीं' हे अनेक वेळा महिलांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. महिला ही जगात प्रत्येक क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत मग ते क्षेत्र राजकीय असो किंवा शैक्षणिक औद्योगिक, सामाजिक असो किवा प्रशासकीय असो शेतीशी निगडीत असो. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. अशाच काही महिलांचा ज्या प्रसिद्धीपासून कोसो दूर राहून पडद्या मागची भूमिका दमदार पणे पार पाडत आहेत.

### राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्काराने सोमवारी यांचा होणार सन्मान

**■ वैशाली मुकुंद साबळे (आदर्श माता ),रेखा भाऊसाहेब घुले(आदर्श शेतकरी महिला ),वंदना परिवंत गायकवाड (आदर्श महिला सरपंच), ब्रह्मकुमारी सुशिला बहेनजी (आध्यात्मिक समाजकार्यातील उत्कृष्ट महिला),कु.डॉ.शेख मेहविश आरा (आदर्श महिला वैद्यकीय अधिकारी), कीर्ती हांगे (आदर्श महिला शिक्षिका), ॲड स्वाती राजेंद्र जाधव (आदर्श शैक्षणिक व समाजकार्य ), श्रीमती कवडे अनिता साहेबराव (आदर्श ग्रामसेविका), अंकिता राजेंद्र जाधव ( आदर्श ग्राम महसूल अधिकारी), ज्ञानेश्वरी शंकर लांडे (आदर्श पशुधन पर्यवेक्षक महिला अधिकारी), ह भ प पुष्पाताई उमेश जगताप (उत्कृष्ट समाज प्रबोधनकार महिला), दिपाली अशोक काकडे (उत्कृष्ट खेळाडू), बावदाणकर संजीवनी सोपान (आदर्श कृषी सहाय्यक महिला), रुक्मिणी संपत मराठे (आदर्श अंगणवाडी सेविका), सुनिता रामदास जगताप (आदर्श आशा वर्कर), अंजली दिगंबर वाघमारे (उत्कृष्ट सुपरवायजर), सोनाली रुपेश उपाध्ये (उत्कृष्ट महिला उद्योजिका), ॲड पुष्पा भगत- गायकवाड (आदर्श महिला विधीज्ञ ), विजया मुळे (आदर्श समाज कार्य महिला) शिवनेरी महिला बचत गट पांढरी (आदर्श महिला बचत गट), वंदना सुरेश भैसाडे (आदर्श परिचारिका), वैष्णवी नामदेव रांगुळे (आदर्श कवियत्री), पूजा बिबीषण देवळकर- धोंडे (आदर्श महसूल सेविका), अर्चना सुभाष आरडे (उत्कृष्ट महिला पोलीस कर्मचारी), कल्पना गणेश पाटील (आदर्श सून ), सविता उगले (आदर्श सेविका), कोमल थेटे ( उत्कृष्ट रांगोळी महिला आर्टिस्ट), सुनिता नाथा शिंनगारे (उत्कृष्ट आशा वर्कर) या विविध क्षेत्रातील महिलांचा सोमवारी सकाळी ११ वाजता आष्टी पंचायत समिती सभागृहात महिला दिनानिमित्ताने शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून 'नारी सन्मान २०२५' हा पुरस्कार देऊन आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गौरव करणार आहे.**





आष्टी तालुका युवा पत्रकार संघ, आष्टी

या पुरस्कार सोहळ्याला उपविभागीय अधिकारी वसीमा शेख या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून तहसीलदार वैशाली पाटील, पोलिस उपविभागीय अधिकारी बाळकृष्ण हानपुडे, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, नगराध्यक्षा बेग मिर्झा आयशा इनायतुल्ला, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, मुर्शदपूर कासारी ग्रामपंचायतीच्या सरपंच शालिनी अशोक मुळे,नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, ग्रामीण रुग्णालय अधिक्षक डॉ चारूदत्त पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश तांदळे, केंद्रीय फिल्म सल्लागार समिती मंडळ सदस्य डॉ स्मिता बारवकर महावितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, डॉ प्रियांका सिंघण आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्याला जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष निसार शेख, सचिव जावेद पठाण, कार्याध्यक्ष अक्षय विधाते, संघटक समीर शेख, सहसचिव संतोष नागरगोजे,कार्यवाहक अतुल जवणे,गहिनीनाथ पाचबैल,कोषाध्यक्ष प्रेम पवळ, संतोष तांगडे, ॲड किशोर निकाळजे, सोपान पगारे,सल्लागार राजेंद्र लाड,संतोष दाणी,बा म पवार,अजय कापरे, विठ्ठल राख, ओंकार कदम, संस्कार लाड,मारूती संत्रे, सचिन पवार आदी परिश्रम घेत आहेत.

## संपादकीय

# खरोखरच खतरे में...

'आयसिस' वा अन्य कोणा दहशतवादी संघटनेस इतकीच खुमखुमी असेल तर त्यांनी आपले जे काही आहे ते शौर्य पॅलेस्टिनी भूमी रक्षणार्थ दाखवावे... स्वत:चे चालते पाय स्वत:च्या हाताने कुऱ्हाड मारून कसे जायबंदी करावेत याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिकेत न्यूऑर्लिन्स येथे नववर्षदिनी झालेला दहशतवादी हल्ला. त्यात ११ जणांचा हकनाक बळी गेला. त्यातील आरोपी 'आयसिस' या इस्लामी अतिरेकी संघटनेशी संबंधित असल्याचे प्राथमिक चौकशीतून दिसून येते. त्याआधी जर्मनीतील ख्रिसमस बाजारपेठेतील हल्ल्यात पाच जण ठार झाले. दोन्हीही हल्ल्यांतील मारेकऱ्यांची पद्धत एकच. गर्दीच्या स्थळी सुसाट वेगात वाहन घुसवायचे आणि जमेल तितक्यांस त्याखाली चिरडायचे. ना शस्त्राची गरज ना अस्त्राची. हे हल्ले अमेरिका आणि जर्मनी या देशांत का झाले, यांस तर्कशुद्ध उत्तर नाही. उद्या अन्य कोणत्या देशात तसे हल्ले होतील याचा अंदाज तर्काच्या आधारे बांधता येणार नाही. अमेरिकी सरकारने अलीकडे काही इस्लामचे वाकडे केले होते आणि जर्मनीने इस्लामच्या विरोधात काही पावले उचलली होती, असेही नाही. उलट हे दोन देश इस्लाम आणि इस्लामी याविषयी तूर्त अधिक सहिष्णू आहेत. अमेरिकेत डेमॉक्रॅटिक पक्षाची सत्ता आहे आणि जर्मनीत सहिष्णू असे 'सोशल डेमॉक्रॅट्स' सत्तेवर आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन हे इस्लामीविरोधी नाहीत आणि जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शॉल्झ यांच्याही मनात इस्लामविषयी शत्रुत्व नाही. तरीही या दोन देशांतील अश्राप नागरिकांस इस्लामी दहशतवाद्यांनी विनाकारण लक्ष्य केले. या दोन देशांतील राजकीय परिस्थिती लवकरच बदलेल. बायडेन यांच्या जागी सरळ सरळ इस्लामविरोधी डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येतील आणि जर्मनीतही होऊ घातलेल्या निवडणुकांत कडव्या उजव्यांस संधी मिळेल. म्हणजे आगामी काळ इस्लामींसाठी अनुक्रमे अमेरिका आणि जर्मनी आणि त्यामुळे युरोपात खडतर असेल. अशा वेळी आगामी काळात आपणास सहानुभूती मिळेल असे वागायचे की आपल्याविषयीचा संताप आणखी वाढेल अशी कृत्ये करायची?

याचे भान इस्लाम धर्मीय मुखंडांना नाही आणि हीच खरी इस्लामींची समस्या आहे. युरोपातील ऑस्ट्रियापासून ते अटलांटिकपलीकडील अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशा अनेक देशांत इस्लाम धर्मीयांबाबत संशयाचे वातावरण तयार होऊ लागले असून त्यास फक्त आणि फक्त इस्लाम धर्मीयच जबाबदार आहेत. आताही अमेरिकेत वा जर्मनीत झाले त्याचा निषेध करण्यास इस्लामी देश पुढे आल्याचे दिसत नाही; ते का? सध्या पश्चिम आशियातील एकाही देशात शांतता नाही. इजिप्त, सीरिया, लेबनॉन, येमेन, इराक, इराण इत्यादी अनेक दाखले देता येतील. यातील पॅलेस्टाइन आणि इस्रायल हा नापाक संघर्ष सोडल्यास अन्यत्रच्या अशांततेसाठी पाश्चात्त्य देशांस बोल लावता येणार नाही. सीरिया, येमेन, इराण आदी देशांतील राज्यकर्तेच नादान निघाले. कोणी जनतेच्या जिवावर अय्याशी करत राहिला तर अन्य कोणी धर्माच्या नावे आपल्याच देशांतील महिलांची मुस्कटदाबी करत राहिला. या इस्लामी- त्यातही तेलसंपन्न- देशांची लूट एके काळची महासत्ता इंग्लंड, नंतर अमेरिका या देशांनी केली हे खरे. ओसामा बिन लादेन वा इस्लामी धर्मवादाची काडी पेटवणारी 'मुस्लीम ब्रदरहूड' असो. ही सर्व अमेरिकी अर्थकारणातून आकारास आलेली पिलावळ हेही खरे. तथापि ते अर्थकारण संपले. सौदी अरेबिया, इराण यांसारख्या इस्लामी सत्तांनी आपापले अर्थकारण स्वत: राखण्यास सुरुवात केली. अशा वेळी त्याच अर्थकारणाचा जास्तीत जास्त लाभ कसा घेता येईल असे प्रयत्न करण्याऐवजी इस्लामी जगतातील एक घटक दहशतवादाचा अवलंब करताना दिसतो. हे मूर्खपणाचे आहे. 'आयसिस'ने अमेरिकेत कितीही हाहाकार घडवून आणला तरी त्या देशाचे काहीही दीर्घकालीन नुकसान होणारे नाही. याआधी 'अल कईदा'ने '९/११' घडवले. त्याहीआधी त्याच वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारती स्फोटकेधारी मालमोटारी आदळवून पाडण्याचा प्रयत्न युसुफ रामझी याने १९९३ साली केला. काय वाकडे झाले अमेरिकेचे? पाकिस्तानने भारतात २६/११ घडवून आणले. आज त्या देशाची अवस्था काय? आपली एक 'टीसीएस' कंपनी समग्र कराची स्टॉक एक्स्चेंजला खिशात टाकेल, ही त्या देशाची अवस्था.

# वाढीव टप्पा निधीची अर्थसंकल्पात तरतूद करा

## बीड जिल्हा विनाअनुदानित कृती समितीचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना निवेदन

» बीड | प्रतिनिधी

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात 14 ऑक्टोबरच्या निर्णयाची अंमलबजावणी करून टप्पा वाढीसाठी निधी मंजूर करा अशी मागणी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

14 ऑक्टोंबरच्या शासन निर्णयानुसार वाढीव टप्पा अनुदानासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा संघटनेच्या वतीने गेली पाच महिन्यांपासून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. परंतु सरकारने मात्र विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या टप्पा वाढ अनुदानाची मागणी गांभीर्याने न घेता सातत्याने दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या सर्व राज्यातील विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने 8 मार्च जागतिक महिला दिनी संपूर्ण राज्यासह बीड जिल्ह्यात जेल भरो आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या



आंदोलनासाठी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांकडे रीतसर परवानगी मागितली परंतु पोलिसांनी बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जेलभरो आंदोलनासाठी परवानगी नाकारली. पोलिसांनी जेलभरो आंदोलनाला परवानगी नाकारल्या नंतर आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम असलेल्या विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शांततेच्या सनदशीर मार्गाने आपल्या मागण्यांच्या संदर्भातल्या शासनाला निवेदन सादर करण्याची पोलिसांनी विनंती केली. पोलिसांच्या या विनंतीला मान देऊन मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव यांच्या सह जिल्हा कार्यकारणी सदस्य विश्वनाथ मुंडे आणि महेंद्र वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांच्या दालनामध्ये जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर बीड जिल्हा शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.दरम्यान बीड जिल्ह्यासह राज्यातील सर्व विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडे लक्ष लागले आहे.

# अनिषा शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाने आष्टीकरांची मने जिंकली

## महाभारत,शेतकरी व्यथा,शिव तांडव,सोशल मिडियाचे सादरीकरण ठरले लक्षवेधी

» आष्टी | प्रतिनिधी

महाभारतातील श्रीकृष्ण जन्म, द्रौपदीचे वस्त्रहरण, युद्धभूमीवरील सादरीकरण तसेच सद्यस्थितीत शेतकऱ्यांच्या समस्या,सोशल मिडीयाचा होणारा अती वापर आणि त्यातून विद्यार्थ्यांची बदलत चाललेली मानसिकता यासह विविध नृत्य, संगीत, नाटक आणि इतर कला प्रकार सादर करत आष्टी शहरातील अनिषा ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आष्टीकरांची मने जिंकली.

शहरातील पिंपळेश्वर देवस्थान संचलित अनिशा ग्लोबल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी सायंकाळी 6 ते 10 या वेळेत संपन्न झाले. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव,संचालक ह.भ.प.रामदास डोरले महाराज,सुखलाल मुथा,प्रा.लक्ष्मण रेडेकर,संजय मुळे, सौ. प्राजक्ता धस यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दुरावत चाललेली माणसे त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकत जाणारी तरुणाई यावर प्रकाश टाकत सामाजिक संदेश देत कुटुंबातील वाढत असलेला विसंवाद याला सोशल मीडिया कशा पद्धतीने कारणीभूत आहे,हे विद्यार्थ्यांनी त्यांच्या नाटीकेतून सादर केले. तर सद्यस्थितीत शेतमालाला मिळणारा बाजार भाव,अवकाळी,गारपीट यासह अन्य कारणांनी पिकांचे होणारे नुकसान त्यामुळे कर्जबाजारी होत चाललेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आले.शिव तांडव नृत्याने,तर चिमुकल्यांच्या नव नवीन कला आणि संस्कृतींचा परिचय करून देत त्यांच्यातील कलात्मक क्षमतांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.या कार्यक्रमासाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.






# जय भवानी महाविद्यालय जागतिक महिला दिन साजरा

» पाटोदा | प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे मा प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर च्या आधी सभा सदस्य डॉक्टर प्राध्यापिका कल्पना घारगे मॅडम महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्राध्यापक सौ रकटे मॅडम हिंदी विभागाचे डॉक्टर वंदन जाधव प्रा डॉ अशोक देवगुडे सर व सौ नाईक नवरे मॅडम उपस्थित होत्या मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली उपस्थित मान्यवरांचा विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला यानंतर या कार्यक्रमाचे प्रस्तावित कार्यक्रमाधिकारी डॉक्टर लोखंडे बी बी यांनी केले या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना ग्रंथपाल सौ प्र रकटे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महिलांना आरंभीच्या काळात कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक सामाजिक राजकीय अधिकार नव्हती स्वातंत्र्यानंतर या अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी आज जगाच्या पातळीवर हा दिवस साजरा करण्यात येतो व महिलाचा सन्मान करण्यात येतो असे मनोगत व्यक्त केले तर विद्यापीठ आधी सभा सदस्य प्राध्यापक डॉक्टर घारगे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना समाजातील अनेक यशस्वी महिलांची यशोगाथा सांगून मुलींनी आत्मसन्मानासाठी समोर येण्याचे मनोगत व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना समाजातील महिलांचे स्थान याविषयी आपले मनोगत व्यक्त करून फार पूर्वी काळापासूनच जगाच्या इतिहासात महिलांचा सन्मान केला .तो महिलांचे नेतृत्व अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे .

# पाझर तलावासाठी संपादीत जमिनीवर पवनचक्कीचे उपकेंद्र ; कारवाईस टाळाटाळ!

## मावेजा मागणाऱ्या शेतकऱ्यांला दिवसभर पोलिसांनी डांबुन ठेवले : डॉ.गणेश ढवळे

» पाटोदा | प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील धनगरजवळका येथे पाझर तलाव क्रमांक ७ साठी सर्व्हे गट नंबर ८ मधील संपादीत केलेल्या जमिनीवर पवनचक्की द्वारे निर्मित वीजेसाठी जवळपास ५ कोटी रुपये खर्चून सरकारी जमिनीवर २२० केव्ही चे उपकेंद्र रेन्यु पावर कंपनीने बांधण्यात आले आहे. प्रशासकीय आणि राजकीय हस्तक्षेपामुळे या फसवणूक प्रकरणी कारवाई करण्यास पोलिस प्रशासन टाळाटाळ करत आहे.

मात्र याचवेळी दुसरीकडे पाटोदा तालुक्यातील बेनसुर येथील शेतकरी बापु बंकट आर्सुळ आणि मयुर भाऊसाहेब झोडगे यांनी त्यांच्या गट क्रमांक ४५ मधील शेताचा मोबदला न देताच शेतातुन तार ओढण्याचे काम करणाऱ्या कंपनीला काम करू नका अशी विनंती करताच पवनचक्की कंपनीच्या सांगण्यावरून पाटोदा पोलिस प्रशासनाचा ताफा घटनास्थळी दाखल झाला आणि शेतकऱ्यांचे काही प्रश्न आहेत का?

संबंधित शेतकऱ्याला कंपनीने मोबदला दिला आहे का याची खातरजमा न करताच दमदाटी करत पोलिस गाडीत घालून पाटोदा पोलिस ठाण्यात दिवसभर डांबुन ठेवले आणि रात्री पोलिस संरक्षणात काम सुरुच होते. यामुळे एकंदरीतच मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पवन ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणी कामांना पोलिस संरक्षण दिले जात असताना संबंधित शेतकऱ्याचे ना हरकत अथवा करार किंवा कायदेशीर दस्तावेज कंपनीकडे आहेत का? शेतक-याला मोबदला मिळाला आहे का? शेतकऱ्यांच्या काही अडचणी आहेत का?? याची शहानिशा न करताच पोलिस बळावर शेतकऱ्यांवर अन्याय होत असुन शेतक-यांना वाली कोण?? अ

### पत्रकाराला वार्तांकन करण्यास मज्जाव ; पोलिसांची भुमिका संशयास्पद : मुस्तफा पठाण पत्रकार

**■ पोलिस प्रशासनाने पवनचक्की कंपन्यांना संरक्षण देऊ नये अशी भुमिका कोणीच घेणार नाही. मातृ पोलिस प्रशासनाने पवनचक्की कंपन्यांकडून उचल घेतल्यागत पवनचक्की कंपनीचे हस्तक असल्यासारखे वागु नये.शेतक-यांना मोबादला न देताच काम पूर्ण करण्यासाठी पोलिस प्रशासनाकडुन सहकार्य होत असेल तर शेतकऱ्यांवर होणा-या अन्यायाला कोण संरक्षण देणार? मी स्वतः पत्रकार असुन माझे ओळखपत्र दाखवून सुद्धा पोलिसांनी वार्तांकन करण्यास मज्जाव केला. पत्रकारांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न असुन संबंधित प्रकरणात पोलिस अधीक्षक बीड नवनित कांवत यांची भेट घेऊन तक्रार करणार असल्याचे पत्रकार तथा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ सक्रिय प्रचारक बीड तालुका मुस्तफा पठाण यांनी सांगितले.**

### पोलिस प्रशासनाला हाताशी धरून पवनचक्की कंपन्यांची मोगलाई सुरू : बाळासाहेब मोरे पाटील

**■ पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांकडून पोलिस प्रशासनाला हाताशी धरुन मोगलाई सुरू असुन दडपशाहीचा अवलंब करत असुन अशिक्षित अडाणी शेतकऱ्यांची दिशाभूल करत कायद्याची भिती दाखवून शेतकऱ्यांवर अन्याय सुरू आहे.पाटोदा पोलिस स्टेशनच्या आधिका-यांनी शेतकऱ्यांना मोबदला दिला नसताना कोणतीही शहानिशा न करता विचारलेल्या प्रश्नांना उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाही आणि पोलिस प्रशासनाच्या मनमानी कारभार विरोधात जन आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे बाळासाहेब मोरे पाटील प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच यांनी सांगितले.**






## कत्तलीसाठी आणलेल्या १४ गोवंशीय जनावरांची सुटका ; अंबाजोगाई पोलिसांची कारवाई

» अंबाजोगाई | प्रतिनिधी

शहरातील बाराबाई गल्ली परिसरात गोवंश जनावरे निर्दयपणे बांधून ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे बीड पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई पोलिसांनी शुक्रवारी रात्री उशिरा छापा टाकत 14 गोवंश जनावरांची सुटका केली.

अंबाजोगाई शहरातील बाराभाई गल्लीत काही गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना मिळाली होती. त्या आधारे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, सपोनि कांबळे, पोउपनि पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 07 मार्च 2025 रोजी रात्री 11:43 वाजता बाराबाई गल्लीत रवाना होत छापा मारला. यावेळी 14 गोवंशीय जनावरे, ज्यांची एकूण किंमत सुमारे ₹,39,000/- इतकी आहे, ती निर्दयपणे बांधलेली आढळली. पोलिसांनी पंचनामा करून जनावरांना ताब्यात घेतले आणि पुढील सुरक्षेसाठी वरवटी येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे गोरक्षण शाळेत हलवले. या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात प्राण्यांच्या छळ प्रतिबंधक कायदा 1960 (कलम 11(1)(d), 11(1)(e)), महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियम 1976 (कलम 5 आणि 9), तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम (कलम 119) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अंबाजोगाई पोलिस करत आहेत.

## यश संपादन करण्यासाठी जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमाची तयारी ठेवा : डॉ. धोंडे

» आष्टी | प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रम घेण्याची तयारी ठेवावी. कोणतेही काम करताना मनापासून करावे यश निश्चित मिळते असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य व युवा नेते अजयदादा धोंडे यांनी कडा येथे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत आनंदराव धोंडे महाविद्यालयात झालेल्या पदवीप्रदान समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ अजयदादा धोंडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, उपप्राचार्य डॉ. बापु खैरे, उपप्राचार्य डॉ. भास्कर चव्हाण, उपप्राचार्य डॉ. वाघुले, प्रा. पंडित औटे, प्रा. महेमुद पटेल, प्रा. बाळासाहेब धोंडे, प्रा. दत्तात्रय बोडखे, प्रा. गोपिनाथ बोडखे व इतरांची उपस्थिती होती. प्रारंभी स्व. बाबाजी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.पुढे बोलताना डॉ. अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, भविष्यात चांगले करिअर करण्यासाठी विचारपूर्वक क्षेत्र निवडावे,नौकरी व व्यवसायांमध्ये अपयश आले तरी निराश होऊ नका, एक ना एक दिवस यश निश्चित मिळते. पदवी घेतल्यानंतर खरी जबाबदारी विद्यार्थ्यांवर पडते. पदवीनंतर नौकरी, व्यवसाय करा आई-वडिलांचे व महाविद्यालयाचे नावलौकिक करा. विद्यापिठातील पहिल्या महाविद्यालयामध्ये आपल्या संस्थेचे भगवान महाविद्यालय व आनंदराव धोंडे हि दोन महाविद्यालये आहेत ही कौतुकास्पद बाब आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, हा महाविद्यालयाचा चौथा पदवीप्रदान समारंभ आहे. विद्यार्थ्यांनी कष्ट करुन मिळवलेली पदवी स्वीकारणे हा जिवनातील आनंदचा दिवस आहे. पदवी घेताना तीन वर्षांत मिळालेल्या ज्ञानाचा भविष्यात चांगल्या कामासाठी उपयोग करावा. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी सांगितले की, आपले विद्यापिठ सुरू झाले त्यावेळी अंतर्गत फक्त नऊ महाविद्यालये होती आज साडेचारशे महाविद्यालये आहेत. पदवी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना खुप कष्ट सहन करावे लागतात. या पदवीचा सन्मान करावा. पदवी मिळविल्याचा आनंद वेगळाच असतो. पदवी मिळाली, आता येथून पुढे गरुड भरारी घेण्यासाठी तयार रहा. पदवी घेताना विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीयन पेहराव परिधान करायला पाहिजे. सुत्रसंचलन प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ बापु खैरे यांनी मानले.



## आमदार प्रकाशदादा सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपदी संधी द्या : नगराध्यक्ष शेषराव जगताप

» वडवणी | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील विकास प्रश्नांची जाण असणारे व प्रशासनाचा दांडगा अनुभव तसेच मराठवाड्यातील जनतेचे प्रश्न अवगत असलेल्या आमदार प्रकाशदादा सोळंके यांना कॅबिनेट मंत्री कधी संधी द्या, दादा हे अजितदादा पवार यांच्या गटातील ज्येष्ठ नेते असून दादांनी यापूर्वी सहकार मंत्री म्हणून यशस्वी भुमीका निभावली तसेच परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही काम करीत असताना त्यांनी पालकत्व निभावले आहे, जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठीच पालकमंत्री असतो हे दाखवून दिले, सतत दुष्काळग्रस्त व ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखले जाणाऱ्या बीड जिल्ह्याची ओळख पुसण्यासाठी प्रकाशदादांना कॅबिनेट मंत्रीपदी संधी द्या, अशी मागणी वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष शेषराव जगताप यांनी केली आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, अजित दादा पवार गटातील रिक्त झालेले कॅबिनेट मंत्रीपदी दादांना संधी द्या, यासाठी कार्यकर्ते आग्रह धरू लागले आहेत, प्रकाशदादांना प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे ,त्यांची प्रशासनावर वचक असून आजवर ते निष्कलंक राजकारणी म्हणून ओळखले जाते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री



कै. सुंदर रावजी सोळंके साहेब यांच्याकडून राजकारणाची धडे गिरवून सर्वसामान्यांच्या भल्याकरिता आजवर राजकारण केले, त्यांच्यावर कसल्याही प्रकारचा आरोप अद्याप पर्यंत नाही, विरोधकांनाही दादांवर आरोप करीत असताना शंभर वेळा विचार करावा लागतो.जनतेचे जिव्हाळ्याचे प्रश्न कसे सोडवायचे याचा त्यांना मोठा अनुभव आहे तसेच त्यांची प्रशासनाच्या कामावर बारकाईने लक्ष असते, दुष्काळग्रस्त बीड जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्याची ओळख पुसण्यासाठी तसेच मराठवाड्याचे प्रलंबित विकास कामे मार्गी लावण्यासाठी दादांना कॅबिनेट मंत्रीपदी संधी देणे ही काळाची गरज आहे, ते अजितदादा पवार यांच्या गटातील ज्येष्ठ नेते आहे, दादांनी मागच्या 50 वर्षापासून सर्वसामान्यांच्या हिताकरीताच राजकारण केले.

## सामाजिक समतोल राखण्यासाठी सदभावना पदयात्रेत सामील व्हा : राहुल सोनवणे

» पाटोदा | प्रतिनिधी

राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील मसाजोग ते बीड सदभावना पदयात्राचे कॉंग्रेसच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील राष्ट्रीय कॉंग्रेसचे खा .खासदार सौ. रजनी पाटील यांनी विशेष लक्ष केंद्रित केले असून सदरील सदभावना पदयात्रा यशस्वी करण्याच्या अनुषंगाने खासदार रजनी पाटील यांच्या सुचनेवरून,बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, कॉंग्रेस पक्षाचे महाराष्ट्र राज्य युवक सचिव तथा केज नगरपंचायत विद्यामान नगरसेवक व माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील,केज नगरपंचायत नगर उपाध्यक्ष पशुपतीनाथ दांगट, प्रविणकुमार शेप,कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक शिवाजीराव कोकाटे, समीर देशपांडे, तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव, अ‍ॅड, विशाल मस्के, यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे बोलत होते कि सामाजिक समतोल राखण्यासाठी सदभावना पदयात्रेत सामील व्हा असे ते बोलत होते

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते शिवाजीराव कोकाटे हे होते. यावेळी सदरील बैठकीचे प्रस्ताविक राहुल जाधव यांनी केले. सदरील कार्यक्रमात कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष यांनी जिल्ह्यातील गेल्या तीन चार महिन्यातील गुन्हेगारीची पार्शश्वभूमी वर मुद्देसूद भाष्य करत, जिल्ह्यातील असणारी ओळख ही सामाजिक समता, सहिष्णूता व पुरोगामी विचार तसेच समतावादी विचाराचा वारसा व सामाजिक समतोल अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील राजकारण विरहित समतावादी, पुरोगामी विचार जपणारे व संविधानाचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येकाने सदभावना पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन उपस्थितांना शासकीय विश्रामगृहात येथील बैठकीत केले. यावेळी आनंदराव कोकाटे,शहाजीराजे कोकाटे,येवलवाडी उपसरपंच तथा सेवा सहकारी सोसायटी संचालक, राहुल नागरगोजे, बालाजी पवळ, हनुमंत तांबे, चंद्रकांत साठे, सचिन सवासे,शेख मुन्नाभाई केबलवाले,अजिनाथ वीर, प्रताप जाधव, नितीन राऊत, सय्यद सरफराज (गुड्डू) सुनील नारायणकर, सचिन डिडुळ यांच्यासह अनेकजन उपस्थित होते.करण्यासाठी

यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रीय कॉंग्रेसचे उपाध्यक्ष प्रा.सुनिल वाघमारे तर राष्ट्रीय युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनिल काळे आभार प्रदर्शन यांनी केले.



हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक सचिन मनोहर पवार, यांनी मिनाक्षी प्रिंट्स, कुसळंब ता. पाटोदा जि. बीड - 413207 येथे छापून साप्ताहिक दिव्यवास्तव कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज चौक कुसळंब, ता. पाटोदा जि. बीड - 413207 (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक सचिन मनोहर पवार मो. 9921801919, Email.divyavastav19gmail.com THIS NEWSPAPERS IS PRINTED, PUBLISHER, OWNED BY SACHIN MANOHAR PAWAR, AT Meenakshi PRINTERS,KUSLAMB TQ.PATODA DIST.BEED AND PUBLISHED AT THE OFFICE WEEKLY DIVYA VASTAV, CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ CHOWK KUSLAMB, TQ.PATODA DIST.BEED - 413207 (MAHARSTHRA).Mob.9921801919, Email.divyavastav19gmail.com

# पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांचा ऐतिहासिक निर्णय!

## शिरूर उत्पन्न बाजार समितीला स्वातंत्र्य बहाल

» पाटोदा | प्रतिनिधी



शिरूर तालुका निर्मितीनंतर पुन्हा शिरूर तालुक्याला स्वातंत्र्य मिळालं असुन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी शिरूर तालुक्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय देत ऐतिहासिक निर्णय घेत शिरूर उत्पन्न बाजार समितीला स्वातंत्र्य बहाल केलं आहे.पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात दि.८ मार्च शनिवारी रोजी सर्व संचालकांची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सौ.रूपाली किरण शिंदे पाटील, उपसभापती श्री.पांडुरंग नागरगोजे यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक

संपन्न झाली.या बैठकीला प्रमुख उपस्थिती जेष्ठ नेते रामकृष्ण बांगर यांची होती.या बैठकीत ऐतिहासिक निर्णय घेत पाटोदा व शिरूर उत्पन्न बाजार समितीचे वेगवेगळे विभाजन करून शिरूर उत्पन्न बाजार समितीला स्वतंत्र्य मान्यता देणाचा एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला आहे.

पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळांची स्थापना झाल्यानंतर अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून त्यामध्ये प्रामुख्याने पाटोदा व शिरूर तालुक्यातील आडत व्यापाऱ्यांची वेळोवेळी बैठक घेऊन त्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातच आपले व्यवसाय सुरू करावा व लिलाव पद्धतीने शेतकरी बांधवांचा माल खरेदी करावा तरच त्यांचा परवाना नुतनीकरण करण्यात येईल तसेच त्यांना सर्व सोईसुविधा मार्केट यार्डात देण्यात आल्या आहेत व प्रमाणिक प्रयत्न करण्यात येत असुन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत रस्ते असो किंवा मुख्य रस्त्याचे काम आदी सुविधा परवाना धारक व्यावसायिकांना उपलब्ध व्हावा यासाठी पाटोदा नगरपंचायत तथा जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे पाठपुरावा सुरू असून लवकरच त्यावर तोडगा काढण्यावर भर देण्यात येत आहे. या आर्थिक वर्षात १६ लाख २२ हजार रुपये मार्केट कमिटी नफ्यात असुन लोकनेत्या पंकजाताई मुंडे आणी आमदार सुरेश अण्णा धस यांच्या नेतृत्वात यशस्वी वाटचाल सुरु आहे.तसेच लवकरच शेतकऱ्यांचा शेतमाल लिलाव पद्धतीने खरेदी विक्रीचा उद्घाटन सोहळा आ.सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याने कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकऱ्यांनाही यांचा थेट लाभ होणार आहे.असे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी माध्यम प्रतिनिधीशी संवाद साधताना केला आहे.

**तोट्यात असलेले मार्केट कमिटी आर्थिक वर्षात 16 लाख 22 हजाराने नफ्यात**

# गेल्या सहा महिन्यापासून शासकीय धान्य गोदामात काम करणाऱ्या माथाडी कामगारांना पैसे द्या नसता तिव्र आंदोलन : भाई विष्णुपंत घोलप

» पाटोदा | प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील पुरवठा विभागाच्या दुर्लक्षामुळे जिल्ह्यातील सर्व गोदामातील हमालांना (माथाडी कामगारांना) सहा महिन्यापासून मजुरी मिळालेली नाही ती तात्काळ देण्यात यावी. महागाई निर्देशांकाबाबत मा.उच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२३ रोजी आदेश देऊन ही त्याची अंमलबजावणी अद्याप केलेली नाही ती तात्काळ करावी. शासनाने आदेश देऊन ही थेट वाहतुक टप्पा १ व टप्पा २ चे काम गोदामातील हमालाकडुन करून घेण्याचा आदेशाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही ती करण्यात यावे. शासनाने गंभीर दखल घेऊन कष्टकरी घाम गाळणाऱ्या शासकीय धान्य गोदामातील माथाडी कामगार (हमाल) यांना केलेल्या कामाचे एका बाजुला शासन सहा महिन्यापासुन पैसे देत नाही आणि दुसऱ्या बाजुला शासकीय कर्मचाऱ्यांचे केंद्र आणि राज्य सरकार ८ व्या वेतन आयोगाची तयारी करीत आहे ही कष्टकरणाऱ्या माथाडी कामगारांची शोकांतीका असुन याला राज्यकर्ते व प्रशासन व्यवस्था जबाबदार आहे याबाबत तात्काळ दखल न घेतल्यास माथाडी कामगारांबरोबर भारतीय शेतकरी कामगार पक्ष जिल्हा बीड तिव्र आंदोलन करेल असे लेखी निवेदन मा.उपविभागीय अधिकारी पाटोदा याचे मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना व माहितीस्वत पालकमंत्री, खासदार ,शेकापचे भाई जयंत पाटील,अध्यक्ष/सचिव बीड जिल्हा माथाडी व असरंक्षीत कामगार मंडळ तसेच संघटनेचे राजकुमार घायाळ यांना देण्यात आले. या प्रसंगी गणेश लोंढे, प्रशांत नाईकवाडे, वसंत चव्हाण, गणपती कुटे, लक्ष्मण घोलप, लखुळ विर, बांगर, कदम, महाराज, आजिनाथ गर्जे, पिंटु अडागळे सह इतर उपस्थित होते.

# संतोष देशमुख प्रकरणात माझी मान खाली गेली : पंकजा मुंडे

## मस्साजोगचे सरपंच आणि भाजपचे पदाधिकारी असलेल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणाने बीड जिल्ह्यात देशात चर्चेचा विषय ठरला!

» बीड | प्रतिनिधी

'माझ्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी आत्महत्या केल्या. मी लोकसभेला हरले तरीही माझी मान खाली गेली नाही. पण, संतोष देशमुख हत्या प्रकरणात माझी मान खाली गेली आहे', अशी खंत राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली. संतोष देशमुख हत्या, बीड जिल्ह्यातील उसवलेली सामाजिक वीण आणि कार्यकर्त्यांची गुन्हेगारी या मुद्द्यावर पंकजा मुंडेंनी सविस्तर भूमिका मांडली.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाबद्दल बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, "संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी कोण आहेत, हे न्यायालयातील सुनावणीतून समोर येईल. ही एका व्यक्तीची नाही, तर नैतिकतेची हत्या आहे.

एका माणसाचा जीव जातो. त्याबाबत वातावरण निर्मिती कऱण्ययात येते. एका समाजाला, जातीला गुन्हेगाराच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. यामुळे सगळा समाज सुन्न झाला आहे."




### सत्तेवर आहे, जे करायचे ते करा ; हे सांगणे चुकीचे

**■ संतोष देशमुख माझा बुथ प्रमुख होता, कार्यकर्ता होता; त्यामुळे मलाही दुख वाटतंय. सत्तेमुळे अहंकार निर्माण होतो. सत्ता असताना कार्यकर्त्यांना सांभाळणे अवघड असते. मी सत्तेवर आहे, जे करायचे ते करा, असे राजकीय नेत्यांकडून सांगितले जाते; हे चुकीचे आहे", असे म्हणत पंकजा मुंडेंना राजकीय नेत्यांच्या भूमिकेवर टीका केली. बीडचे नाव गोपीनाथ मुंडे यांच्याशी जोडले होते, आता बीडचे नाव वाईट अर्थाने घेतले जात आहे. वंजारी समाजाच्या मुलांना वसतिगृहे, शाळांमध्ये वाईट वागणूक दिली जात आहे. बीडमध्ये सामाजिक ऐक्याला तडा गेला आहे. लोकांच्या आक्रमक भाषणांमुळे समाजांमधील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. वंजारी समाजाला लक्ष्य केलं जात असून हे चुकीचे आहे, अशी नाराजी पंकजा मुंडेंनी व्यक्त केली.**

### लोकसभेला मला त्याचा फटका बसला

**■ "लोकसभा निवडणुकीत बीडमध्ये माझा सहा हजार मतांनी पराभव झाला. मी निवडणूक लढवण्यास उत्सुक नव्हते. मराठा आरक्षण प्रश्न पेटला होता. मराठा विरुद्ध ओबीसी, असा संघर्ष तीव्र असतानाच्या काळात मी लोकसभा लढवली. त्याचा मला फटका बसला. परिस्थिती माझ्या विरोधात होती. त्यामुळे मी पराभव स्वीकारला. माझ्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी आत्महत्या केल्या. मी लोकसभेला हरले तरीही माझी मान खाली गेली नाही. पण, संतोष देशमुख प्रकरणात माझी मान खाली गेली आहे", अशी सल पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली.**

# सद् भावना पदयात्रेत सहभागी व्हा : बजगुडे पाटील

» बीड | प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या नेतृत्वात दिनांक ०८ व ०९ मार्च रोजी सद्भावना पदयात्रा मस्साजोग ते बीड निघत असुन दिवसेंदिवस वाढत चाललेला जातीयद्वेष कमी करण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व जाती धर्मातील सुजाण बंधु भगिनींनी सहभागी होण्याचे आवाहन कॉँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे.



०८ मार्च रोजी सकाळी स्व. संतोष अण्णा देशमुख यांना अभिवादन करुन या पदयात्रेस सुरवात होत असुन नांदुरफाटा, येळंबफाटा मार्गे नेकनुर याठिकाणी मुक्कामी असेल तसेच दुसऱ्या दिवशी ०९ मार्च रोजी सकाळी ०८ वाजता बंकटस्वामी संस्थान येथुन सुरू झालेली ही पदयात्रा मांजरसुंभा, पाली मार्गे बार्शीनाका, मोमिनपुरा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करुन सुभाष रोड, बस स्टँड मार्गे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे या पदयात्रेचा समारोप होणार आहे. या सद् भावना पदयात्रेत कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अ. भा. कॉँग्रेसच्या सचिव खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्यासह राज्यभरातील अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत. तरी बीड जिल्ह्यातील सर्व जाती धर्मातील लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कॉँग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.



# अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

» बीड | प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब जी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली नवनिर्वाचित राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेबांच्या नेतृत्वात शिवसेनेची समृद्ध वाटचाल सुरु आहे. सर्वसामान्य लोकांच्या हिताचे कार्य शिंदे साहेब करत आहेत यामुळेच शिंदे साहेबांची महाराष्ट्रभरात ताकद वाढविण्यासाठी आम्ही सर्व एकत्रित येऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश करत असल्याची भावना किरण चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात व्यक्त केली तर महिला आघाडी मराठवाडा संपर्क प्रमुख संगीता चव्हाण यांनी शिवसेनेत नव्याने प्रवेश करणाऱ्यांचे स्वागत करून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वात आपण एकजुटीने काम करू असे मनोगत भाषणात सांगितले. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी मनोजराव चव्हाण, केशवदास महाराज, दगडू दादा गायकवाड, वसंतराव जाधव, ढोले बप्पा जाधव, गणेश आनेराव, सचिन चव्हाण, राजेभाऊ दुधाळ, अंकुश दुधाळ, विष्णू लंगोटे, महादेव लांडगे, गणेश जगताप, नामदेव अंकुटे, मुकुंद आनेराव, गौरव वानखेडे, हरी आनेराव सर्व कार्यकर्त्यांचा स्वागत सत्कार करून शिवसेनेत प्रवेश करून घेतले. याप्रसंगी बीड जिल्हा शिवसेना युवासेना महिला आघाडी पदाधिकारी लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

### एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्य जनतेच्या जीवनातील आशेचा किरण : अनिलदादा जगताप

**■ महाराष्ट्राच्या मातीतील कणखर नेतृत्व, सर्वसामान्य जनतेसाठी अहोरात्र झटणारे, गोरगरीब व अनाथांच्या जीवनातील आशेचा किरण, प्रखर इच्छाशक्तीने राज्याच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असलेले लोकनेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब अठरा पगड जातीच्या कार्यकर्त्यांना सक्षम आधार आणि ताकद देणारे नेतृत्व आहे. उपमुख्यमंत्री शिंदे साहेब हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा रथ पुढे ओढण्याचं काम करत आहेत तर खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब देखील हाच वारसा जपण्यासाठी छोट्यातल्या छोटया कार्यकर्त्यांच्या सोबत राहून त्यांच्या समस्या अडचणी सोडवत आहेत. कार्यकर्ता या नात्याने आम्ही शिंदे साहेबांसोबत पूर्ण ताकदीने काम करतोय आता तुम्ही देखील आमच्याबरोबर एकजुटीने काम करा आणि पक्षाची ताकद वाढवा असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी उपस्थिती कार्यकर्त्यांना अहवान केले.**

# आता लोकांना कळेल हू इज धंगेकर ?

मुंबई- वृत्तसंस्था : कॉँग्रेसचे नेते व कसब्याचे माजी आ. रवींद्र धगेकर यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी पुण्यातील असंख्य कार्यकर्त्यांचाही शिवसेना शिंदे गटात प्रवेश झाला. २०२३ मध्ये कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या बालेकिल्ल्यात सध्याचे आमदार हेमंत रासने यांचा पराभव केला होता. त्यानंतर त्यांची राज्यभरात चर्चा झाली होती. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत धंगेकर यांना पराभव स्वीकारावा लागला होता. त्यानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "रवींद्र धंगेकर हे पुण्यातील लोकप्रिय नेते आहेत. स्वतःच्या कामाने त्यांनी त्यांची ओळख निर्माण केली आहे. यांच्या पोटनिवडणुकीवेळी मी तिकडे होतो. ती निवडणूक गाजली पण, सगळी फौज लागली तरी धंगेकरांनी बाजी मारली. लोकसेवक काय असतो हे त्यांनी दाखवले. आता तुम्ही शिवसेनेत आला आहात, त्यामुळे लोकांना कळेल हू इज धंगेकर?" दरम्यान काल सकाळी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन कॉँग्रेस सोडणार असल्याची माहिती दिली होती. ते म्हणाले, "मी गेल्या १०-१२ वर्षांपासून या पक्षाबरोबर काम करत आहे. पक्षातील सहकारी हे कुटुंबातील सदस्य बनले आहेत.